लोकपत्र दि ०१/०७/२०२३

# चार गुन्ह्यातील दहा आरोपींना अटक, एक गावठी पिस्टल, तीन खंजीर जप्त

लोकपत्र ०१/०७/२०२३

नांदेड/प्रतिनिधी

शहरात मारहाण करून खंडणी मागणाऱ्या तब्बल चार गुन्ह्यातील आरोपींना शिवाजीनगर गुन्हे शोध पथकाने ताब्यात घेवून त्यांच्याकडून एक गावठी पिस्टल, एक खंजीर, एक मोबाईल असा मुद्देमाल जप्त केला आहे.

फिर्यादी नामे सिद्धांत ज्ञानेश्वर पवार वय १९ वर्ष व्यवसाय शिक्षण आरसीसी क्लासेसच्या विद्यार्थ्यास चाकुचा धाक दाखवून मारहाण करून त्याच्याकडील रोख रक्कम काढून घेण्यात आली होती. या प्रकरणी आरोपी नामे लयख शेख इस्माईल वय १९ रा. कंधार, साहिल विजय उर्फ पंजाब राठोड वय १९ रा. भावसारचौक नांदड, प्रशिक मिलींद केळकर वय १९ रा. लेबरकॉलनी यांना अटक करून त्यांचेकडील मोबाईल व खंजर नगदी २०००/- जप्त केले. तसेच गावठी पिस्टल असल्याची माहिती मिळाल्याने आरोपी जयकुमार उर्फ सोनू पि. कैलास राउत वय २२ वर्ष व्यवसाय शिक्षण बुलेट शोरूमचे बाजुला, सन्ना कॉलनीचे बाजुला रा. सुमेधनगर, नांदेड यास बाबानगर येथून ताब्यात घेवुन त्याचेकडुन एक गावठी पिस्टल किंमत २२,०००/- ची जप्त करून गु.र.न २०५ / २३ कलम ३/२५ आर्म अॅक्ट प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

त्याचप्रमाणे अधिकची गोपनिय माहितीचे आधारे जुने फायर स्टेशन जवळुन तिन इसम चेतन अशोक कांबळे वय २९ वर्ष व्यवसाय खाजगी नोकरी रा. आंबेडकरनगर नांदेड, शिवाराज रंजीत दळवे वय २८वर्ष व्यवसाय बेकार रा. लक्ष्मी रेसीडंसी कॅनॉल रोड तरोडा, नांदेड, अंन्शु रावसाहेब कांबळे वय १९




वर्ष व्यवसाय बेकार रा.कसबे गुरूजीच्या बाजुला आंबेडकरनगर नांदेड यांचेकडुन एक खंजर जप्त करून गु.र.न २०३ / २३ कलम ४/२५ आर्म अॅक्ट प्रमाणे व गोकुळनगर पाण्याची टाकीजवळून तिन इसम १ विवेक उर्फ विक्की पि. नरहरी सुर्यवंशी वय १९ वर्ष व्यवसाय बेकार रा. त्रिरत्न बौध्द विहार जवळ आंबेडकरनगर नांदेड, ०२. कुणाल रामसिंग परमार वय २७ वर्ष व्यवसाय बेकार रा. भगतसिंग रोड जुना मोंढा नांदेड, आकाश मच्छींद्र नवगीरे वय १७ वर्ष व्यवसाय मजुरी रा. आंबेडकरनगर यांना ताब्यात घेवुन त्याचेकडुन एक खंजर जप्त करून गु.र.न २०४ / २३ कलम ४ / २५ आर्म अॅक्ट प्रमाणे असे गुन्हे दाखल करून गुन्हेगाराचे कृत्यावर प्रतिबंध घालुन चांगली कामगीरी केली.

सदरची कामगीरी पोलीस अधीक्षक नांदेड, श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधीक्षक नांदेड अविनाश कुमार, अपर पोलीस अधीक्षक मोकर डॉ. खंडेराव धरणे तसेच उप विभागीय पोलीस अधिकारी सुरज गुरव, पोलीस निरीक्षक मोहन भोसले पोलीस स्टेशन शिवाजीनगर यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथक प्रमुख पोलीस उप निरीक्षक मिलींद सोनकांबळे व अमलदार दिलीप राठोड, शेख इब्राहीम, रविशंकर बामणे, देवसिंग सिंगल, शेख अझहर, दत्ता वडजे, विष्णु डफडे यांनी चार्ली पथकातील अमलदार आकाश सावंत, सुरज काकडे, सायबरसेल येथील अमलदार ओढणे, सिटीकर यांचे मदतीने पार पाडली.